प्रेसनोट

दिनांक - १८/१०/२०१७

## करोडोचे आमिष दाखवुन फसवणुक करणाऱ्या नायजेरीयन टोळीस सायबर सेलने नवी मुंबईतुन केली अटक

चिंचवड पुणे येथील एका व्यापाऱ्याच्या फेसबुक अकाऊंटवर Olivia Johnson या फेसबुक अकाऊंटची फ्रेन्ड रिक्वेस्ट आली त्यावर एका महिलेचा फोटो होता. रिक्वेस्ट स्विकारल्यानंतर समोरील महिलने चॅटींगव्दारे सलगी वाढविली. त्यानंतर काही दिवसांनी ती Azelis Pharm Investment company Limited UK ह्या कंपनीमध्ये खरेदी विक्री अधिकारी म्हणुन काम करीत असल्याचे सांगुन तीची कंपनी औषधे बनवित असुन त्यासाठी लागणारे Udara Liquid Herbal Oil हे ऑईल तीची कंपनी ५००० डॉलर प्रती लिटरने ह्या भावात विकत घेत आहे. तेच ऑईल भारतात २००० डॉलर प्रती लिटरने भेटते. तुम्ही ते ऑईल आमच्या कंपनीला ५००० डॉलर प्रती लिटर या भावात विका. मिळणाऱ्या नफ्यातुन ३० टक्के मला द्या. मी कंपनीचा व तुमचा १५० लिटरचा करार करुन देते असे आमिष दाखविल्याने फिर्यादी व्यवसाय करण्यास तयार झाले. त्यांना Olivia Johnson हिने भारतातील काही एजंटचे नंबर दिले. त्यानुसार पिडीत व्यापाऱ्याने भारतातील एजंटशी संपर्क करुन ऑईलबाबत विचारणा केली. भारतीय एजंटने पिडीत व्यापाऱ्यास १,४५,०००/- रुपये प्रती लिटर ऑईल देण्यास तयारी दर्शवली. त्यानंतर पिडीत व्यापाऱ्यास वेगवेगळे आमिषे दाखवुन १२० लिटर आईल खरेदी करण्यास भाग पाडले. परंतु समोरील कंपनी पेमेंट देत नसल्याने व आणखी ऑईल खरेदी करण्यास दबाव आणत असल्याने पिडीत व्यापाऱ्याने सायबर सेलकडे तक्रार दिली होती. सायबर सेलच्या चौकशीअंती पिडीत व्यापाऱ्याची नायजेरीयन गुन्हेगारांनी १,०४,४७,०००/- रुपयांची आर्थिक फसवणुक केल्याचे निष्पन्न झाल्याने चिंचवड पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. २५३/२०१७ भादंवि. कलम ४१९, ४२० सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम २००८ चे कलम ६६ (सी) ६६ (डी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सायबर क्राईम सेलकडुन सदर गुन्ह्याचा समांतर तपास करण्यात येत होता. त्यानुसार आरोपींने वापरलेले मोबाईल नंबर, ईमेल इत्यादींचे विश्लेषन करण्यात आले. त्यातुन आरोपी नवी मुंबईत असल्याबाबत निष्पन्न झाल्याने गजानन पवार, पोलीस निरीक्षक, सायबर क्राईम सेल, यांच्या नेतृत्वाखाली एक पथकाने खारघर या ठिकाणी आरोपी राहत असलेल्या ठिकाणी छापा टाकुन गुन्ह्या करण्यासाठी वापरण्यात आलेले २० मोबाईल, २ लॅपटॉप, ३ सिमकार्ड (त्यात युके व नायजेरीयाचे सिमकार्ड), ३ डोंगल, २ राऊटर, २ पासपोर्ट. १ पेनड्राईव्ह, ५ लिटर ऑईल असलेले एक कॅन इत्यादी मुद्देमाल मिळुन आल्याने सदरचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच १) Amara Obiasogu @ Robert Spiff @ Frank Age- 30 Yrs, मुळ राहणार- नायजेरीया रा. सेक्टर नं. ३०, ओवेगांव ता. पनवेल, जि. नवी मुंबई २) Ekene Unachukwu Age- 30 Yrs मुळ राहणार- नायजेरीया रा. सदर या नायजेरीयन आरोपींना अटक करण्यात आले आहे. त्यांच्याकडे तपास करता ते एका भारतीय महिलेच्या मदतीने हे रॅकट चालवित असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदरच्या भारतीय महिलेचा व इतर नायजेरीयन आरोपींचा शोध सुरु आहे. आरोपींनी आत्तापर्यन्त दिल्ली, राजस्थान, गुजरात, तमिळनाडु, केरळ येथील नागरीकांची फसवणुक केल्याचे दिसुन येत आहे. तसेच आरोपी युके येथुन बोलत असल्याचे दर्शविण्यासाठी त्यांनी इंटरनॅशनल रोमींगमध्ये युकेचे सिमकार्ड वापरल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपींकडुन जप्त मोबाईलचे विश्लेषन केले असता सदरच्या मोबाईलमध्ये जानेवारी २०१७ पासुन १६० वेगवेगळे सिमकार्ड वापरल्याचे निष्पन्न झाले आहे. दाखल गुन्ह्याचा तपास गजानन पवार, पोलीस निरीक्षक, सायबर क्राईम सेल, पुणे शहर हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ, मा. सपोआ श्री. मिलींद पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. राधिका फडके यांच्या मार्गदर्शनाखाली, गजानन पवार, पोलीस निरीक्षक, सपोनि सागर पानमंद व कर्मचारी अस्लम आत्तार, अजित कुन्हे, अमित औचरे, शाहरुख शेख, प्रसाद पोतदार, दिपक माने, दिपक भोसले, संतोष जाधव यांनी केली.

याव्दारे नागरीकाना अवाहन करण्यात येते की, ईमेल julietremond92@gmail.com, poojabhatt088@gmail.com, info@elzacherbals.com, drthonnywilliams590@yahoo.com फोन नंबर ७०५३२९८९९१, ४४७९७३५५८२७९, ७८३५९१७१२२, ४४२०३५१४०८४२, ४४८७०३२१८९०२ या वरुन फसवणुक झाली असल्यास तात्काळ सायबर क्राईम सेल, पुणे शहर यांच्याशी संपर्क करावा. तसेच करोडो रुपयाच्या आमिषाला बळी पडु नये. नायजेरीयव्दारे Agathosma Betulina Liquid Oil, Udara Liquid Herbal Oil, Seeds इ. खरेदीचे आमिष दाखविले जाते. ते खरेदी केल्यास मोठी फसवणुक होवु शकते.

Shiremath

(सुधीर हिरेमठ)
पोलीस उप-आयुक्त



